सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/ 153
दिनांक :- 14 JAN 2025

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- "वाचन संकल्प महाराष्ट्राचा" हा उपक्रम राबविण्याबाबत तसेच स्कुल कनेक्ट सबंधी ऑनलाईन बैठकीस उपस्थित राहण्याबाबत तसेच यथोचित कार्यवाही करण्याबाबत.**

संदर्भ :- १. या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२४/३६५० दिनांक २४ डिसेंबर २०२४.
२.मा.कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्रमांक :- संकिर्ण २०२४/ई९०५२२१/समन्वय दिनांक २० डिसेंबर २०२४.
३.उच्च शिक्षण संचालनालय विभाग, यंनी निांक २३/१२/२०२४ रोजी आयोजित केलेली बैठक.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी विद्यापिठ, महाविद्यालये व सार्वजनिक गंथालयांमध्ये **"वाचन संकल्प महाराष्टाचा "** हा उपक्रम राबविणेबाबत तसेच **"स्कुल कनेक्ट"** सबंधी दिनांक २३/१२/२०२४ रोजी २३/१२/२०२४ रोजी ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आलेली होती. तसेच याबाबत या कार्यालयामार्फत दिनांक २६/१२/२०२४ रोजी सुध्दा ऑनलाईन बैठक आयोजित करण्यात आलेली होती. त्या बैठकीमध्ये सदर उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यास कळविलेले आहे तसेच याबाबतचा आवश्यक तो अहवाल सादर करण्यास कळविलेले आहे.

तथापी मा.प्रधानसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीमध्ये उच्च शिक्षण विभागामध्ये सदर उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात येत असुन तंत्रशिक्षण विभागातील संस्थेमध्ये सदर उपक्रम राबविण्याबाबत उदासिन असल्याबाबत नमुद केलेले आहे, ही बाब निश्चीतच शोभनिय नाही.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, **"वाचन संकल्प महाराष्टाचा "**तसेच **"स्कुल कनेक्ट"** हा उपक्रम प्राचार्यांनी विशेष लक्ष घालुन प्राधान्याने पार पाडावा. तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, **"वाचन संकल्प**

**महाराष्टाचा** " हा उपक्रम राबवितांना विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय, विभागीय स्तरीय व राज्य स्तरीय गुणानुक्रम निवड करावी. तसेच निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे हस्ते बक्षीस वितरण होणार आहे.

**(मनोज म. अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.